# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०५/०९/२०२५ ( शुक्रवार )**

---

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीवर गुन्हा नोंद**
**स्थानिक गुन्हे शाखा,नागपुर ग्रामीण जिल्हा यांची कामगिरी**

पो.स्टे. कळमेश्वर :— दिनांक ०४/०९/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांचे पथक कळमेश्वर पोलीस स्टेशन परीसरात पेट्रोलींग करीत असता गुप्त बातमीदारा मार्फतीने माहिती मिळाली की, आरोपी नामे शुभंम बलराम हिरणखेडे हा बस स्टॉप कळमेश्वर येथे अवैधरित्या शस्त्र बाळगुन फिरत आहे. अशा विश्वसनीय खबरेवरून पोलीसांनी बस स्टॉप कळमेश्वर येथे जावुन आरोपीचा शोध घेतला असता आरोपी मिळुन आल्यावर त्याला ताब्यात घेवुन त्याची पंचासमक्ष झडती घेतली असता त्याचे ताब्यात लोखंडी धारदार चाकु मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष नमुद लोखंडी धारदार चाकु जप्त केला.

आरोपी शुभम बलराम हिरणखेडे, वय २५ वर्ष, रा. उपरवाही याचे विरूद्ध पोस्टे कळमेश्वर येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम सह कलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीला अटक करण्यात आली आहे.

## अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीवर गुन्हा नोंद
## मौदा पोलीसांची कामगिरी

**पो.स्टे. मौदा** :— दिनांक ०४/०९/२०२५ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फतीने माहिती मिळाली की, आरोपी नामे राजेन्द्र सोमा कोडापे हा चिरवा गावातील चौकात अवैधरित्या तलवार घेवुन बसला आहे. अशा विश्वसनीय खबरेवरून मौजा चिरवा येथे जावुन आरोपीचा शोध घेतला असता आरोपी नामे राजेन्द्र सोमा कोडापे, वय ४० वर्षे, रा. चिरवा ता. मौदा हा हातात तलवार घेवुन मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष नमुद आरोपीच्या ताब्यातुन एक लोखंडी तलवार जप्त केली.

आरोपी राजेन्द्र सोमा कोडापे, वय ४० वर्षे, रा. चिरवा ता. मौदा याचे विरूद्ध पोस्टे मौदा येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम सह कलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनिय**म** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना देशीदारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक ०५/०९/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांचे पथक पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौज कन्हान कांद्री शिवार येथे नाकाबंदी केली असता एक मोपेड गाडी क्रमांक एम. एच. ४० सी के ८०३० ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता बोरीमध्ये देशीदारू मिळुन आली. आरोपी नामे **पियुष अजित शेंडे, वय २४ वर्ष,रा.न्यू मार्केट कन्हान** हा अवैधरीत्या दारूची वाहतुक करतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या १८० एम एल च्या १४८ निपा किंमती ११,८४०/— रूपये आणि

२) एक मोपेड गाडी क्रमांक एम. एच. ४० सी के ८०३० किंमती १,००,००० /—रूपये असा एकुण किंमती १,११,८४० /— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



## अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू बाळगणाऱ्या,व्रिकी तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, २४ गुन्हे नोंद एकुण १२,२४४/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक ०४/०९/२०२५** रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण १२,२४४/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे श्रीचंद रूपचंद गेडाम, वय ४५ वर्ष, रा. रयतवाडी, ता. रामटेक याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन आरोली** येथे आरोपी नामे ताराचंद पुनाजी रावते, वय ७० वर्षे, रा. खात, ता. मौदा, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे १) राजेंद्र रामाजी रेवतकर , वय ४० वर्ष, रा. वार्ड क्र १४ नरखेड तह नरखेड २) निलेश रमेश लोंखडे, वय ३६ वर्ष, रा वडेगाव उमरी तह नरखेड ३) दिपक खुशालसिंग जखनावत, वय ३४ वर्ष, रा. वार्ड क्र १३, मोवाड, तह. नरखेड यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १) लालचंद शामरावजी उईके रा पंचमवाडी ता काटोल जि नागपुर आणि महीला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे १) अनिलाल हिराजी वरखडे, वय ६५ वर्ष, रा. पेठमुक्तापुर, ता. नरखेड, जि. नागपुर आणि एक महीला आरोपी याचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन वेलतुर** येथे आरोपी नामे नत्थु हनुमानजी गायधने, वय ४२ वर्ष ,रा. बोरी नाईक, पुन .ता. कुही याचेवर गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे नारायण झिबल दुधपचारे, वय ६९ वर्ष, रा. मांढळ, ता. कुही जि. नागपुर याचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे दोन महीला आरोपी यांचे वर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामें महेश प्रेमसुख वाढी, वय ४२ वर्ष, रा. वार्ड क्र २ तिंडगी २) दुर्गेश शाहु, रा पांढुर्णा, याचेवर गुन्हा नोंद यांचेवर एक गुन्हा तसेच आरोपी नामे आकाश रमेश माटे वय ३० वर्ष रा किल्लापुरा, ता. सावनेर याचेवर एक गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन सावनेर** येथे महीला आरोपीवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन खापा** येथे प्रेमचंद बळीराम शेंडे, वय ५१ वर्ष, रा.कोथुरणा ता.सावनेर जि.नागपुर. याचेवर ,गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे पंडीत गेदलाल सावरकर, वय ५० वर्षे, रा खापरी मोरेश्वर, ता. हिगणा, जि नागपुर, यांचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे सुरज प्रल्हाद नैताम, वय २९ वर्ष, रा.पिपरा ता उमरेड जि नागपुर यांचेवर

गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे १) आझादसिंग हरभजनसिंग बावरी ,वय २२ वर्ष, रा. छोटीबोरी, रूईखेरी, ता जि नागपूर, २) जितेन्द्र नथ्थुजी बोभाटे, वय ४७ वर्ष, रा महावीर वार्ड , हिंगणघाट ह मु प्रभाग क्र ०२ बुटीबोरी, ३) चंद्रप्रकाश वासुदेव वासे, वय ४५ वर्ष, रा सातगाव, रिधोरा, आणि महीला आरोपी,यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे विश्वनाथ इसमल लोंढे, वय ७० वर्षे, रा. विष्णु लक्ष्मी नगर वाघधरेवाडी कन्हान यांचेवर गुन्हा नोंद आहे. अशा आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये २४ गुन्हे दाखल केले आहे.

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**